# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 27 August 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २७ ऑगस्ट २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- पीएम स्वनिधी योजनेचं पुनर्गठन करून योजनेला २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
- जागतिक बाजारपेठेतत अव्वल राहण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध– मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- मराठा आरक्षणाबाबत सरकारसोबत चर्चेला मनोज जरांगे पाटील यांची सशर्त संमती

आणि

- दहा दिवसांच्या गणेशोत्सवाला सर्वत्र उत्साहात प्रारंभ

****

पीएम स्वनिधी योजनेचं पुनर्गठन करून या योजनेला ३१ मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आज नवी दिल्लीत झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ५० लाख नवीन लाभार्थ्यांसह एक कोटी १५ लाख लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याचं उद्दीष्ट निर्धारित करण्यात आलं आहे. पुनर्गठीत योजनेअंतर्गत पहिला हप्ता दहा हजार रुपयांवरून १५ हजार रुपये तर दुसरा हप्ता २० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये करण्यात आला आहे. तिसरा ५० हजार रुपयांचा हप्ता कायम ठेवण्यात आला आहे. योजनेची व्याप्ती टप्प्या टप्प्याने वाढवली जाणार असून, या लाभार्थ्यांमध्ये डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी एक हजार सहाशे रुपये कॅशबॅक रोख परतावा प्रोत्साहन देण्यालाही मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०३० ची बोली लावण्याबाबत केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्या प्रस्तावालाही मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. बोली मंजूर झाल्यास, गुजरात राज्य सरकारला आवश्यक अनुदान देण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

****

ऑपरेशन सिंदूरने दिलेल्या समाधानाला, ऑपरेशन महादेवने आत्मविश्वासाची जोड दिली, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं आहे. ऑपरेशन महादेव यशस्वी करण्यात मोलाचं योगदान दिलेले सैन्यदल, जम्मू काश्मीर पोलिस तसंच केंद्रीय राखीव पोलिस दलातल्या सैनिकांचा आज शाह यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. भारतीय नागरिकांच्या जीवाशी खेळ केल्यास काय परिणाम होतात, हे ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव च्या माध्यमातून दहशतवाद्यांना दाखवून दिल्याचं शाह यांनी नमूद केलं.

****

छत्तीसगड राज्याचा सीमावर्ती भाग असलेल्या भामरागड तालुक्यातील कोपर्शी गावानजीकच्या जंगलात आज पोलिसांशी झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. मृतांमध्ये एक पुरुष आणि तीन महिलांचा समावेश आहे.

****

जागतिक बाजारपेठेतल्या स्पर्धेत अव्वल राहण्यासाठी तसंच वेगवेगळ्या देशांमध्ये व्यापार वाढवण्याकरता ज्या ज्या सुधारणा आवश्यक आहेत, त्या करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आज मुंबईत वार्ताहरांशी बोलतांना मुख्यमंत्र्यांनी ही बाब नमूद केली. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मोर्चा आज जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटी इथून मुंबईकडे निघाला. यात मराठवाड्यातील नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले आहेत.

दरम्यान, मराठा आरक्षणाबाबत सरकारच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करण्याची तयारी जरांगे पाटील यांनी दाखवली आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्याला दूरध्वनीवरून चर्चेसाठी आमंत्रण दिल्याचं सांगत, ही चर्चा सर्वांसमोर करण्याची अट जरांगे यांनी ठेवली. मुंबईत आझाद मैदानात आंदोलनासाठी परवानगी घेण्याच्या

न्यायालयाच्या सूचनेचं पालन करू असं सांगत, आंदोलन शांततेत होईल, असं जरांगे पाटील यांनी आश्वस्त केलं.

****

राष्ट्रीय नेत्रदान पंधरवाडा येत्या आठ सप्टेंबरपर्यंत पाळला जात आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी ही माहिती दिली. या पंधरवड्यात आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, स्वयंसेवी संस्था आणि शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून जनजागृतीपर माहिती अभियान चालवलं जात आहे.

****

गणेशोत्सवाला आज सर्वत्र मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. घरोघरी सकाळच्या सुमारास गणेशाची विधीवत प्रतिष्ठापना झाली, दुपारनंतर सार्वजनिक गणेश मंडळांनी ढोल ताशाच्या निनादात मिरवणुका काढून गणरायांची मंडपात स्थापना केली.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवनात गणरायाची प्रतिष्ठापना करून देशवासियांना गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या. राजभवनात स्थापन करण्यात आलेली ही गणेशमूर्ती शाडू मातीची असून ती नाशिक इथल्या केंद्रीय मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांनी साकारली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत आपल्या शासकीय निवासस्थानी गणेशाची स्थापना केली. राज्यावरच्या संकटांचं निवारण करण्याची प्रार्थना आपण गणरायाकडे केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

छत्रपती संभाजीनगरचं ग्रामदैवत श्री संस्थान गणपती मंदिरात गणरायाची स्थापना करून गणेशोत्सवाला प्रारंभ झाला. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, दुग्धविकास मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉक्टर भागवत कराड यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यात देगलूर इथं पर्यावरणपूरक गणेश मूर्तींची स्थापना केली जात आहे. पेठ अमरापूर गल्लीत कोरलेपवार कुटुंबीयांनी हाताने तयार केलेल्या मातीच्या मूर्ती घरोघरी विराजमान होत आहेत. गेल्या शंभराहून अधिक वर्षांपासून जोपासल्या जात असलेल्या या परंपरेबाबत अधिक माहिती देत आहेत, आमचे वार्ताहर –

**बाईट – अनुरोग पोवळे, नांदेड**

बीड जिल्ह्यात यंदा एक हजार ७६२ सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये गणेश स्थापना होणार आहे. गेल्या वर्षी २८८ गावांत एक गाव एक गणपती संकल्पना राबवण्यात आली होती, यंदा या संख्येत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

लातूर शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी गणरायाचं मोठ्या जल्लोषात आणि ढोलताशांच्या गजरात स्वागत करण्यात आलं. गणेश मूर्ती घेण्यासाठी लहान मुलांचा उत्साह ओसंडून वाहत होता. यंदा चांगला पाऊस झाल्याने नागरिकांमध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचं वातावरण आहे.

हिंगोली शहरासह जिल्ह्यात भर पावसात गणेशाचं उत्साहात स्वागत झालं. आज सकाळपासूनच सर्वसामान्य नागरिकांसह सार्वजनिक मंडळांची गणपती मूर्ती नेण्यासाठी लगबग सुरू होती. नवसाला पावणारा गणपती अशी ओळख असलेल्या चिंतामणी गणपतीची हिंगोली शहरातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

****

गणेशोत्सवानिमीत्त यंदा प्रथमच राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने रील स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या संकल्पनांवर ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील पाठवणं अपेक्षित आहे. या स्पर्धेसाठी एक लाख, ७५ हजार तसंच ५० हजार रुपयांचं अनुक्रमे पहिलं, दुसरं आणि तिसरं तर २५ हजार रुपयांचं उत्तेजनार्थ पारितोषिक दिलं जाणार आहे. याशिवाय महसुल स्तरावरही पारितोषिके दिली जाणार आहेत. सहभागासाठी फिल्मसिटीमुंबई डॉट ओआरजी या संकेतस्थळावर नाव नोंदणी करणं आवश्यक आहे.

****

उत्सव काळात स्वच्छता आणि अन्न सुरक्षेकडे विशेष लक्ष देण्याचं आवाहन अन्न औषध प्रशासनानं केलं आहे. प्रसाद तयार करतांना तसंच वितरित करताना स्वच्छतेवर लक्ष द्यावं, असं अन्न आणि औषध प्रशासन विभागीय सहआयुक्त द. वि. पाटील यांनी म्हटलं आहे

****

सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे पहिले अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कार आज जाहीर झाले. यंदाच्या या पहिल्याच पुरस्कारासाठी डॉ. आनंद चव्हाण, संतोष खेंडे, श्रीकांत शेटे, अजित संगवे, शरणबसवेश्वर वांगी यांची निवड केल्याचं कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितलं. मानपत्र, सन्मानचिन्ह, आणि अहिल्यादेवींची प्रतिमा असं या पुरस्काराचं स्वरूप असून, येत्या शुक्रवारी विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केले जाणार आहेत.

****

हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त उद्या आणि परवा एमजीएम विद्यापीठात आंतरशालेय तसंच आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये जलतरण, बुद्धिबळ, तसंच नेमबाजी स्पर्धेचा समावेश आहे.

****

हवामान

मराठवाड्यात बहुतांश जिल्ह्यांसाठी पुढील तीन दिवस हवामान विभागानं पावसासाठी यलो अलर्ट जारी केला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि परभणी जिल्ह्यासाठी बुधवार, गुरुवार, शुक्रवार तर नांदेड जिल्ह्यासाठी आज आणि उद्या यलो अलर्ट जारी केला आहे.

****